# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-02.06.2026** **वार- मंगळवार**

---

**श्रमशक्ती**

नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्रातील उद्यमांचं वार्षिक सर्वेक्षण करण्याच्या अनुषंगानं 5 ते 10 जून या कालावधीत तळेगाव दाभाडे इथल्या राष्ट्रीय सुगीपश्चात् तंत्रज्ञान संस्थेत प्रशिक्षण कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. अशी माहिती अर्थ आणि सांख्यिकी आयुक्तालयाचे सह आयुक्त सुनील जाधव यांनी दिली. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्यामार्फत 'पीएलएस' आणि 'ए एस यु एस ई' बाबत सर्वेक्षण यावर्षी जानेवारी ते डिसेंबरपर्यंत करण्यात येत आहे.

**पशुवैद्यकीय**

भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड, इंडसइंड बँक आणि राज्याचा पशुसंवर्धन विभाग यांच्याद्वारे राबविण्यात येत असलेल्या 1962 या मोफत हेल्पलाइनमुळं राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचं जाळं बळकट केलं आहे. फिरत्या पशुवैद्यकीय वाहनांच्या माध्यमातून या उपक्रमानं विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या दारात पशुवैद्यकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. आतापर्यंत 8 लाखांहून अधिक जनावरांवर उपचार करण्यात आले असून, यामुळं पशुधनाची वेळेवर, सुलभ आणि विश्वासार्ह काळजी घेणं शक्य झालं आहे.

**घनकचरा**

पिंपरी शहरातील मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करणं अनिवार्य असून, नियमांचं पालन न करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचं महापालिकेचे आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी यांनी सांगितलं आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम 2026 अंतर्गत मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारी निवासी संकुलं, हॉटेल्स, मॉल्स, शैक्षणिक संस्था, रुग्णालयं तसंच व्यवसायिक आस्थापनांसाठी सीपीसीबी पोर्टलवरील नोंदणी सक्तीची करण्यात आली आहे.

**मारहाण**

पुण्यातील बिबवेवाडी परिसरात जनगणना करणाऱ्या महिला प्रगणक आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर झालेल्या बेदम मारहाणीच्या पार्श्वभूमीवर, पुणे महापालिकेनं झोपडपट्टी आणि संवेदनशील भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. जखमी महिला प्रगणकावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू असून, या हल्लाप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी पोलीस आयुक्तांकडे संवेदनशील भागात गस्त वाढवण्याची विनंती केली आहे. तसंच, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी महापालिकेचे सुरक्षा रक्षकही सोबत दिले जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. महापौर मंजुषा नागपुरे यांनी सांगितलं की, झोपडपट्टी सर्वेक्षणाच्या गैरसमजातून हा हल्ला झाला आहे.

**अफवा**

पिंपरी चिंचवड शहरात सुरू असलेल्या 'जनगणना 2027'च्या घरसूचीकरण आणि घरगणना सर्वेक्षणासंदर्भात समाज माध्यमांवर दिशाभूल करणारे संदेश, अफवा आणि अप्रमाणित माहिती प्रसारित होत असल्यानं नागरिकांनी अशा अपप्रचारावर विश्वास ठेवू नये, असं आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनानं केलं आहे. जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया ही अधिकृत,

पारदर्शक आणि पूर्णतः डिजिटल पद्धतीनं राबविली जात असून, कोणत्याही खोट्या माहितीस बळी पडू नये, असं महानगरपालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉक्टर विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केलं आहे.

**आंदोलन**

कांद्याला तीन हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव द्यावा, नाफेडमार्फत कांद्याची खरेदी करावी आदी मागण्यांसाठी महाविकास आघाडीनं आज पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव तालुक्यात पुणे- नाशिक महामार्गावर रास्तारोको आंदोलन केलं. सरकारनं कांद्याच्या शासकीय खरेदीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात अद्याप खरेदी प्रक्रिया सुरू झालेली नाही. त्यामुळे कांद्याची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फतच करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी केली.

**मुख्यमंत्री लाडकी बहीण**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून वगळले गेलेल्या लाभार्थी कागदपत्रं सादर करू शकल्या नाहीत, संपूर्ण छाननी केल्यानंतरच त्यांना अपात्र ठरवलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना स्पष्ट केलं. अपात्र लाभार्थ्यांना आता पैसे दिले जाणार नाहीत, मात्र आतापर्यंत मिळालेले पैसे परत घेतले जाणार नाहीत असंही त्यांनी सांगितलं.

**समाज**

इतिहासाकडून शिकत नाही आणि भूतकाळातील चुका पुन्हा करतो, अशा समाजाचं भवितव्य शंकास्पद राहते. त्यामुळं भारतीय समाज म्हणून आपण इतिहासाकडून बोध घेतला पाहिजे आणि चुकांची पुनरावृत्ती टाळली पाहिजे, असं मत ज्येष्ठ पत्रकार पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांनी पुण्यात व्यक्त केलं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त ब्राह्मण सांस्कृतिक संघ आणि हर घर सावरकर या संस्थांच्या वतीनं आयोजित व्याख्यानात कुलश्रेष्ठ बोलत होते.

**पुरस्कार**

इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशनच्या पुणे शाखेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक श्रीधर जोशी यांना महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्षा अबेदा इनामदार यांच्या हस्ते पुण्यात प्रदान करण्यात आला. या वेळी इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**